आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला आणि वाणिज्य महविद्यालय

कुळगाव बदलापूर

## ग्रंथालय विभाग

आदर्श कला  व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी ग्रंथालय माहिती शास्त्राचे जनक डॉ.एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित् ‘ ग्रंथपाल दिन ‘ साजरा केला जातो तसेच ‘स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे’ औचित्य साधून महाविद्यालय ग्रंथालयाच्या वतीने ऐतिहासिक व चरित्रात्मक तसेच संदर्भ पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगिता पांडे याच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. उदघाटना प्रसंगी ग्रंथपाल श्री.लक्ष्मीकांत सातपुते, प्रा. स्मिता हलकारे सर्व प्राध्यापक व विध्यार्थी उपस्थित होते.

या प्रदर्शनात स्वातंत्र्य चळवळीत ज्यांनी आपले बलिदान केले अश्या स्वातंत्रवीर, क्रांतिकारी आणि समाजसुधारक यांच्यावरील आत्मचरित्र असलेले पुस्तके प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. आपल्या भारताचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा इतिहास विध्यार्थ्यांना व नागरिकांना माहिती व्हावा यासाठी ग्रंथालयात उपलब्ध असणारी पुस्तके ठेवण्यात आली होती जसे की संदर्भ पुस्तके मराठी विश्वकोश, शब्दकोश, ऐतिहासिक शब्दकोश, इंग्रजी -जर्मन शब्दकोश, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण चंद्रलोक, समाज परिवर्तन, महाराष्ट्र सारस्वत, महाभारत, Britannica, Encyclopaedia, World Book, Subaltern Studies, Studies in  Hindu Religion, Great Thinkers on Education पुस्तके प्रदर्शनात ठेवण्यात आली होती.

या प्रदर्शनात  महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यान व्यतिरिक्त शालेय विध्यार्थी व नागरिकांनी असे ४७५ वाचकांनी प्रदर्शनास भेट दिली. ग्रंथपाल श्री. लक्ष्मीकांत सातपुते यांनी मा. प्रभारी प्राचार्यांनी तसेच उपस्थितांचे आभार मानले.

***********